# ऋणनिर्देश

आज मला **"मंगेश पाडगांवकर आणि सुरेश भट यांच्या गझलांचा तुलनात्मक अभ्यास"** विषयावरील प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाकडे सादर करण्यास अतिशय आनंद होत आहे. ही प्रबंधिका पूर्ण करण्यासाठी मला अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व देण्यापर्यंत माझ्या आदरणीय व माननीय मार्गदर्शिका प्राध्यापिका डॉ. सौ. सुलक्षणा दि. कुलकर्णी, उपप्राचार्या व मराठी विभाग प्रमुख, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनामुळे, सहकार्यामुळे व वेळोवेळी प्रबंधिका पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेमुळे मी प्रबंधिका वेळेत पूर्ण करू शकले. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते.

एम्.फिल्. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव, मराठी विभाग प्रमुख डॉ. संभाजीराव देसाई, स.गा.म. कॉलेज, कराड, डॉ.डी.आर.गायकवाड, प्रा. जी.व्ही. माळी या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल त्यांची मी ऋणी आहे.

तसेच आदरणीय प्रा.डॉ.सौ. दिवेकर मॅडम, प्रा.संध्या पाटील व प्रिय मैत्रिण सुचिता औंधकर यांनी केलेल्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे माझे काम सुकर केले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. प्रा. सौ. सूर्यमाला जाधव, प्रा.सौ. निकम मॅडम, प्रा. रैनाक मॅडम, प्रा.डॉ. पाटील सर यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे.

प्रबंधिकेचा अभ्यास करताना सौ. विजया पवार, शुभांगी मुळीक, रुपाली यादव, सौ. सरवसे मॅडम, भारती शेवाळे, श्री गणेश गायकवाड, सतीश पाटील, अरविंद गाढे या मित्र–मैत्रिणींनी वेळोवेळी मदत केली त्याबद्दल त्यांची मी अत्यंत आभारी आहे.

माझ्या सासरचे कुटूंब व माहेरचे कुटुंब यांनी दिलेले प्रोत्साहन व सहकार्य मी शब्दात कसे मांडणार? त्यांच्या सहकार्याशिवाय मी हे कार्यच करू शकले नसते. विशेषत: माझे वडील श्री. अशोक बाळू माळी, आई सौ. मंगल अशोक माळी, भाऊ श्री. सुनिल अशोक माळी, वहिनी सौ. उज्वला सुनिल माळी, बहीण सौ. सुजाता प्रदीप माळी, आर्या व सोहम कुटुंबातील या सर्व सदस्यांची सतत प्रेरणा व सहकार्य मिळाले याबद्दल त्यांचे आभार मानणे हे माझे कर्तव्यच आहे.

त्याचबरोबर प्रबंधासाठी आवश्यक पुस्तकांचा खजिना उपलब्ध करून देणारे 'सद्गुरू गाडगे महाराज' कॉलेज कराडचे ग्रंथालय, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविदयालय, कडेगांवचे ग्रंथालय, नगरवाचनालय, कराडचे ग्रंथालय या सर्व ग्रंथालय प्रमुख व त्यांच्या सहकार्यांची मी आभारी आहे.

तसेच प्रस्तुत प्रबंधाची संगणकाद्वारे जुळणी करणाऱ्या व हा प्रबंध वेळेत पूर्ण करण्यास मदत करणाऱ्या ज्योती टायपिंग, कराडच्या सौ. सुनिता नांदेडकर यांचीही मी आभारी आहे.

अशा अनेक ज्ञात–अज्ञात व्यक्तींच्या सहकार्यामुळे ही प्रबंधिका मी आपल्यापुढे सादर करू शकले. त्या सर्वांविषयीचा कृतज्ञताभाव व्यक्त करते.

Smali

(सविता माळी)